कृपया प्रसिद्धीसाठी / दि. २८ जुलै २०११

## तारापूर अणु ऊर्जा प्रकल्प पीडितांचा प्रश्न उच्च न्यायालयाच्या ऐरणीवर

मुंबई, गुरुवार : ''तारापूर अणु ऊर्जा प्रकल्प पीडितांचा प्रश्न यापुढे रेंगाळत राहता कामा नये, पुढच्या तारखेपूर्वी सर्व माहिती तयार ठेवा,'' असा आदेश न्यूक्लीअर पॉवर कॉर्पोरेशन आणि महाराष्ट्र सरकारला मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाचे न्यायमूर्ती श्रीमती रंजना देसाई आणि न्यायमूर्ती श्री रणजीत मोरे यांनी आज दिला. ही माहिती प्रकल्पपीडितांच्या रिट अर्जात सहभागी झालेले माजी केंद्रीय मंत्री श्री राम नाईक यांनी दिली.

अधिक माहिती देतांना श्री राम नाईक म्हणाले, ''१०८० मेगॅवॅटचा तारापूर प्रकल्प ३ व ४ कार्यान्वित होऊन ५ वर्षे पूर्ण झाली तरीही प्रकल्पपीडितांचे प्रश्न अद्याप पूर्णपणे सोडविण्यात आलेले नाहीत. या प्रश्नाबाबत रिट याचिका २००४ मध्ये दाखल झाली असून त्या माध्यमातून काही प्रश्न सुटले आहेत, परंतु अजूनही बरेच प्रश्न प्रलंबित आहेत. या याचिकेवर गेल्या दीड वर्षात सुनावणी झाली नव्हती म्हणून लवकर सुनावणी करावी असा विनंती अर्ज मी खंडपीठाकडे केला होता. त्यामुळे आज सुनावणी झाली. सुनावणी दरम्यान अद्यापी मच्छिमारांना व्यवसायासाठी समुद्रकिनारी जमीन देण्यात आलेली नाही, गाऱ्हाणे तक्रार निवारण समितीच्या निर्णयांची महाराष्ट्र सरकार अंमलबजावणी करीत नाही तर केंद्र सरकारच्या पुनर्वसन धोरणाप्रमाणे सर्व फायदे अद्याप देण्यात आलेले नाहीत, असे मुद्दे मी मांडले. याशिवाय प्रकल्पपीडितांची घरे, अपुऱ्या नागरी सुविधा आणि मुद्दे प्रकल्पपीडित समितीच्यावतीने ॲड.राजीव पाटील यांनी मांडले. तसेच या प्रकरणाचा लवकर निर्णय करावा, अशी विनंतीही केली.''

न्युक्लीअर पॉवर कॉर्पोरेशनच्यावतीने ॲड.लोपा मुनिम यांनी युक्तिवाद केला. त्यानंतर ''प्रकल्पपीडितांचे खऱ्या अर्थाने पुनर्वसन झाले पाहिजे तसेच सविस्तर माहिती घेऊन पुढील तारखेला या,'' असा निर्देश खंडपीठाने दिला. यावेळी ठाणे जिल्हा पुनर्वसन अधिकारी श्रीमती वैदेही रानडे हजर होत्या. पुढील सुनावणी ११ ऑगस्ट रोजी होणार आहे.

कार्यालय सचिव